Literacy for a Billion

Movie: Balirajache Rajya Yeu De
Year: 2008

Song: Dukh Kitida Jagav
Lyricist: Sudhir Avle

आ...
दु:ख कितीदा जगावं
दु:ख कितीदा जगावं
आभाळ पांघरावं
विसरून त्याही दु:ख यातना
जगण्यास देई जन्म हा पुन्हा
जगण्यास देई जन्म हा पुन्हा
दयाघना दयाघना
आता न सोबतीला राया धनी घराचा
पेलायचा तरीही हा भार जीवनाचा
आता न सोबतीला राया धनी घराचा
पेलायचा तरीही हा भार जीवनाचा
जरी आपले ना भवती
जरी आपले ना भवती
स्मरणात राहिल्या खुणा
जगण्यास देई जन्म हा पुन्हा
जगण्यास देई जन्म हा पुन्हा
उलटून आज पडले
फासे जरी पटाचे
झेलायचे तरी ही आघात संकटाचे
उलटून आज पडले
फासे जरी पटाचे
झेलायचे तरीही आघात संकटाचे
जरी वादळेच भवती
जरी वादळेच भवती
कुणी आसवे पुसावया
जगण्यास देई जन्म हा पुन्हा
आ...
जगण्यास देई जन्म हा पुन्हा

आ...
आईसाठी आमुचा व्याकुळ जीव झाला
आईसाठी आमुचा व्याकुळ जीव झाला
आयुष्य लाभो आमचे
त्या माय माऊलीला
आलो तुझ्याच चरणी
आलो तुझ्याच चरणी
करतो तुलाही प्रार्थना
जगण्यास देई जन्म हा पुन्हा
जगण्यास देई जन्म हा पुन्हा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*